# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक
# अंतःशुद्धीचे सोपान

## *उद्धरण २७*

एकदा एक तरुण अशा स्त्रीच्या प्रेमात वेडा झाला, जिचे त्याच्यावर त्याच्यावर प्रेम नव्हते. तो इतक्या निराशाजनक स्थितीत होता, की इतर कशाचा विचारच करू शकत नव्हता. त्याला कोणत्याच गोष्टीत आनंद वाटत नव्हता. त्याचे भान हरपले होते. शेवटी त्याच्या मित्राने त्याला एका तांत्रिकाबद्दल सांगितले, जो शहराबाहेर राहत होता. तो तरुण थेट तेथे पोहोचला आणि त्याने तांत्रिकाकडे मदतीची याचना केली.

तांत्रिकाचे डोळे काळे होते. ते एका अनैसर्गिक प्रकाशाने चमकत होते. तो म्हणाला, "तुझी जर खरोखर इच्छा असेल, की मी तुला मदत करावी, तर तू माझ्या सूचनांचे तंतोतंत पालन केले पाहिजेस."

तरुण रडत म्हणाला, "मी करेन! मी काहीही करेन! मला फक्त या भयानक भावनेतून बाहेर पडायचे आहे."

तांत्रिकाने सांगितले, "मग, तू चाळीस दिवसांपर्यंत एकदाही प्रार्थना करायची नाहीस, अगदी संकटकाळीही नाही. तसेच तू कोणत्याही प्रकारे ईश्वराच्या आज्ञेचे पालन करायचे नाहीस. पृथ्वीवरील कोणासाठीही कोणतेही चांगले काम करू नकोस. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे तू ईश्वराचे नाव उच्चारायचे नाहीस आणि कोणत्याही प्रकारचा चांगला हेतू व्यक्त करायचा नाहीस. जर तू या सूचनांचे इमानेइतबारे पालन केलेस, तर मी थोडाफार जादूटोणा करून तुझे उद्दिष्ट गाठण्याची काहीतरी क्लृप्ती काढू शकेन."

त्या तरुणाला या आसक्तीपूर्ण आणि एकतर्फी प्रेमरोगातून खरोखरच बाहेर पडायचे होते. म्हणून, तांत्रिकाने जे काही सांगितले ते सर्वकाही त्याने केले. चाळीस दिवसांनंतर तो पुन्हा त्या अंधाऱ्या, रहस्यमय झोपडीत गेला जेथे तांत्रिक राहत होता. त्याच्याजवळ जेवढा पैसा होता, तो सारा त्याने त्या तांत्रिकाला एका ताईतासाठी देऊन टाकला. पण ताईताने आपले काम केले नाही.

तांत्रिक कडवटपणे म्हणाला, "तू माझ्या सूचनांचे पालन केले नाहीस. गेल्या चाळीस दिवसांमध्ये तुझ्या हातून काही ना काही चांगले घडले आहे."

“मी काहीच चांगले काम केलेले नाही,” तरुणाने निषेध केला, “मी शपथ घेऊन सांगतो! या चाळीस दिवसांमध्ये मी ईश्वराबद्दल विचार केला नाही. मी कोणासाठी काहीही चांगले केले नाही. मी एकही दयेचा शब्द उच्चारला नाही. मी कोणतेही पवित्र कार्य करण्यापासून स्वतःला परावृत्त केले. चांगुलपणाच्या जवळपासही जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून मी दूर पळून गेलो. मी तुम्हाला खरे तेच सांगतो आहे.”

“विचार कर, मुला विचार कर. तू काही ना काही केलेच असशील, अगदी छोटेसे काहीतरी. नाहीतर ह्या ताईताने तुझ्यासाठी नक्कीच काम केले असते.”

तरुणाने नकार देत मान हालविली. त्याने गेल्या चाळीस दिवसांचा आढावा घेतला; पण काहीच नव्हते, असे काहीच नव्हते, जे त्या जादूटोण्याला तोडू शकेल. . . फक्त या गोष्टीशिवाय. . . अचानक, तो म्हणाला, “हे असू शकेल का? एके दिवशी कामावर जाताना, जेव्हा मी रस्त्यावरून चाललो होतो, तेव्हा एका खडकाला अडखळलो होतो. आणि मी विचार केला होता, ‘मी हा खडक वाटेतून बाजूला केलेला बरा, जेणेकरून अजून कोणी याला अडखळून पडणार नाही.’”

“आ. . . हा! हे एक सत्कर्म आहे!” तांत्रिक म्हणाला आणि त्याचा आवाज कठोर झाला, “त्या ईश्वराचा उपहास करू नकोस ज्याच्या प्रत्येक आज्ञेची तू चाळीस दिवस अवहेलना केलीस आणि तरीही त्याने त्याच्या उदारतेने हे एक छोटेसे कार्य वाया जाऊ दिले नाही.”

या शब्दांनी तरुणाच्या हृदयात अग्नी चेतविला. त्याची ज्वाला इतकी उंच पेटली, की तिने त्याच्या जुन्या आसक्तीला तत्क्षणी भस्मसात केले आणि ईश्वरप्रेमाचे एक नवे रूप त्याच्या हृदयात तळपू लागले. तो घरी गेला आणि आपला लोहाराचा व्यवसाय त्याने चालू ठेवला. ज्या चमत्कारामुळे त्याचे जीवन बदलून गेले होते तो त्याने सर्वांपासून लपवून ठेवला. प्रत्येक दिवशी तो एक दिनार कमवीत असे. रोज रात्री तो आपली कमाई गरीबांना देत असे. पण त्याचे हृदय तृप्त होते आणि त्याचा आनंद परिपूर्ण होता.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय १० ‘सेवा,’ यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. १५६-१५८.